भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.
दिनांक – ०८/०८/२०१८

- प्रेसनोट –

मौजमजेसाठी मोटार सायकल चोरी करणाऱ्या आरोपीकडुन ८ दुचाकी जप्त.

---

--

दिंनाक.०६/०८/२०१८ रोजी भारती विदयापीठ पोलीस स्टेशनच्या हददीत सहा पोलीस निरीक्षक श्रीशैल रामचंद्र चिवडशेटट्री व तपास पथकातील कर्मचारी हे पेट्रोलिंग करित असताना तपास पथकातील पोलीस कर्मचारी गणेश चिंचकर व महेश मंडलीक यांना गुप्त बातमीदाराकरवी नवले ब्रीजच्या अलीकडे मार्बलच्या दुकानाच्या जवळ ओंकार पाटील नावाचा इसम उभा असुन त्याने आंबेगाव पठार येथुन पॅशन मो सा चोरी केलेली असल्याची गुप्त बातमी प्राप्त झाली होती.

प्राप्त बातमीच्या अंनुषगाने संशयीत आरोपी नामे ओंकार रमेश पाटील, वय १९ वर्षे, रा. भैरवनाथ मंदीराच्या समोर, भवानी मोबाईल शॉपीच्या मागे नऱ्हेगाव पुणे यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे करण्यात आलेल्या तपासात त्याने मौजमजेसाठी भारती विदयापीठ पोलीस ठाणे ३ मो सा , सिहंगड रोड पोलीस ठाणे ५ मो सा दुचाकी चोरल्याचे कबुल केले आहे. सदर संशयीत आरोपीतास सहा पोलीस फौजदार चंद्रकांत फडतरे यांनी अटक करुन त्याच्याकडे केलेल्या तपासात आरोपीताने ज्या इसमांना मो सा विक्री केल्या होत्या, त्यांच्याकडुन एकुण ०८ मोटार सायकल जप्त करण्यात आल्या आहेत. विना कागदपत्रे मोटार सायकल खरेदी करणारे इसमांच्या विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करित आहोत.

वरिल नंमुद अटक आरोपीत नामे ओंकार पाटील याच्याकडुन ३ पल्सर, १ स्प्लेडर प्रो, १ यामाहा एफ झेड, १ हिरो ड्रिम युगा, १ केटीएम डयुक, १ हिरो होडा पॅशन अशा ३,२०,०००/- रु किंमतीच्या एकुण ०८ मो सा जप्त करण्यात आल्या आहेत.

आरोपी ओंकार रमेश पाटील यास मा न्यायालयात हजर केले असता, त्यास दि.१०/०८/२०१८ रोजी पर्यत पोलीस कस्टडी रिंमाड मंजुर करण्यात आली आहे. पोलीस कोठडी दरम्यान आरोपीत यांच्याकडे अधिक तपास करित आहोत.

सदर कामगिरी दक्षिण प्रादेशिक विभाग चे मा अप्पर पोलीस आयुक्त श्री रविंद्र सेनगावकर, परिमंडळ २ पुणे चे मा. पोलीस उपायुक्त, श्री बच्चन सिंग, मा सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार, यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे) विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे सहा पोलीस निरिक्षक श्रीशैल चिवडशेट्टी, व स्टाफ पोलीस कर्मचारी गणेश चिंचकर, महेश मंडलीक, चंद्रकांत फडतरे, कृष्णा निढाळकर, प्रणव संकपाळ, उज्वल मोकाशी, शिवदत्त गायकवाड, कुदंन शिंदे, सर्फराज देशमुख, अभिजीत रत्नपारखी यांनी केलेली आहे.